**तक्रार (यु.एल.पी.) क्र. १४/२०२०.**
**नि.क्र.यूडब्ल्यु—०१.**

**पुढील उलटतपास नव्या शपथेवर सामनेवालातर्फे श्रीमती कोकरे वकीलांच्या वतीने श्रीमती कळके वकीलांमार्फत सुरु,**

हे खरे की, माझे मयत पती परिवहन विभागाकडे १९८८ साली पहिल्यांदा रोजंदारी शिपाई म्हणून कामाला लागले होते व ते २०१८ साली सेवानिवृत्त झाले होते. माझे पती सेवानिवृत्त झालेनंतर आजारी होते त्यामुळे २०२० साली त्यांनी प्रस्तुतचा तक्रार अर्ज दाखल केला. हे खरे की, माझे मयत पतीचे वतीने कामगार युनियनने या न्यायालयात सेवेत कायम करण्यासाठी व आर्थिक फायदे मिळण्यासाठी तक्रार अर्ज यूएलपी क्र. ५६/२००५ असा दाखल केला होता. हे खरे आहे की तो तक्रार अर्ज या न्यायालयाने फेटाळला. हे म्हणणे खरे नाही की तो तक्रार अर्ज या न्यायालयाने गुणवत्तेवर फेटाळला असल्याने प्रस्तुतचा तक्रार अर्ज कायद्याने चालु शकत नाही. हे खरे आहे की माझे पती रोजंदारी सेवक म्हणुनच सेवानिवृत्त झाले. माझे पती दि.१३/०५/२०२२ रोजी वारले. मला दोन मुले व दोन मुली आहेत. प्रस्तुतच्या प्रकरणात माझे मुले व मुली यांना तक्रारदार म्हणुन न जोडण्याचे कारण मी सांगु शकत नाही.

हे म्हणणे खरे नाही की माझे पतीने सामनेवालाकडे दरवर्षी २४० दिवसापेक्षा जास्त दिवस काम केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती रोजंदारी सेवक होते त्यामुळे त्यांना उपदानापोटी कुठलीही रक्कम सामनेवाला कायद्याने देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की सामनेवाला मला मानसिक त्रासापोटी व तक्रार अर्जाच्या खर्चापोटी कुठलीही रक्कम देणे लागत नाही व तशा कुठल्याही रकमा सामनेवालाकडुन मिळण्यास मी पात्र नाही. हे म्हणणे खरे नाही की सामनेवालाने माझे पतीसोबत मी सांगितल्याप्रमाणे कुठल्याही अनुचित कामगार प्रथांचा अवलंब केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की तक्रार अर्जातील व सरतपासणीच्या प्रतिज्ञापत्रातील सामनेवालाविरूध्द केलेला संपुर्ण मजकुर खोटा व चुकीचा आहे.

**फेरतपास काही नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

PRASHANT PRABHAKAR RAJVAIDYA
Digitally signed by PRASHANT PRABHAKAR RAJVAIDYA
Date: 2025.04.19 16:53:38 +0530

(प्र.प्र.राजवैद्य)
सदस्य,
औद्योगिक न्यायालय, सोलापूर.

सोलापूर.
दिनांक :— १५/०४/२०२५.
*माकम/—*